महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बैठक २०२४/प्र.क्र.२१५/११-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २७ मार्च, २०२५

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांनी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांना सादर केलेल्या दि. ०५/०८/२०२४ च्या निवेदनान्वये कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या विविध अडचणी व विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक २६/०८/२०२४ रोजी सहयाद्री राज्य अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीवेळी तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांनी दिलेल्या निर्देशानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेर होणाऱ्या व्यापारावर युजर चार्जेस आकारु नयेत इत्यादी मागण्यांबाबत प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१	प्रधान सचिव (सहकार व पणन)	अध्यक्ष
२	पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
३	श्री. ललित गांधी, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चर	सदस्य (व्यापारी प्रतिनिधी)
४	श्री. जितेंद्र शहा, फेडरेशन ऑफ असोसिएशनस् ऑफ महाराष्ट्र	सदस्य (व्यापारी प्रतिनिधी)
५	श्री. मोहन गुरुनानी, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज ॲण्ड ट्रेड	सदस्य (व्यापारी प्रतिनिधी)
६	श्री. भिमजी भानुशाली, दि ग्रेन राईस ॲण्ड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन	सदस्य (व्यापारी प्रतिनिधी)
७	श्री. राजेंद्र बाठिया, समन्वयक, दि पूना मर्चंटस् चेंबर	सदस्य (व्यापारी प्रतिनिधी)
८	श्री. प्रविणकुमार नाहटा, सभापती महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकार संघ, मर्या. पुणे.	सदस्य (शेतकरी प्रतिनिधी)
९	सभापती, हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.	सदस्य (शेतकरी प्रतिनिधी)

१०	सचिव, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती	सदस्य
११	सचिव, पुणे कृषि उत्पन्न बाजार समिती	सदस्य
१२	सचिव, नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती	सदस्य
१३	सचिव, छत्रपती संभाजी नगर कृषि उत्पन्न बाजार समिती	सदस्य
१४	सचिव, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती	सदस्य
१५	सह संचालक (पणन)	सदस्य सचिव

समितीची कार्यकक्षा:-

अ) अधिनियमाच्या कलम २ (१) अन्वये "बाजार क्षेत्राची" देण्यात आलेल्या व्याख्येची व्याप्ती विस्तृत असल्याने याबाबत कोणत्या सुधारणा करणे शक्य आहे ही बाब तपासणे.

आ) कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेर होणाऱ्या व्यापारावर यूजर चार्जेस आकारु नयेत तसेच परराज्यातून व आयात केलेल्या मालाच्या विक्रीवरील नियमन रद्द करण्यात यावे या मुद्द्याबाबत सविस्तर चर्चा करुन सेसऐवजी प्रति चौरस फूट देखभाल शुल्क आकारणे यासारखा पर्याय तपासणे.

उपरोक्त बाबीच्या अनुषंगाने शिफारशीसह शासनास एक महिन्यात अहवाल सादर करावा.

३. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२७१६१७१०८५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAILESH SHASHIKANT SURVE

Digitally signed by SHAILESH SHASHIKANT SURVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=de61ac402ef01eec8d6c6d90fb32c82cc308744e2b851cc16fb39fe7ce1f1dd3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0E8ED2F069FE90F6EA4E2DFC43BD83581600732F141DAF3517043067D7724F4B, cn=SHAILESH SHASHIKANT SURVE
Date: 2025.03.27 16:19:29 +05'30'

(शैलेश श. सुर्वे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, सहकार व पणन, यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
४. अवर सचिव (२१-स) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. सह संचालक (पणन), पणन संचालनालय, पुणे
७. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, (हिंगणघाट)
८. श्री. प्रविणकुमार नाहटा, सभापती महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकार संघ, मर्या. पुणे.
९. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजी नगर, नागपूर)

१०. श्री. ललित गांधी, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अॅण्ड अॅग्रीकल्चर,
११. श्री. जितेंद्र शहा, फेडरेशन ऑफ असोसिएशनस् ऑफ महाराष्ट्र
१२. श्री. मोहन गुरुनानी, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज अॅन्ड ट्रेड
१३. श्री. भिमजी भानुशाली, दि ग्रेन राईस अॅण्ड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन
१४. श्री. राजेंद्र बाठिया, समन्वयक, दि पूना मर्चंटस् चेंबर
१५. निवडनस्ती (११-स)